# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:06.04.2026** **वार: सोमवार**

1. राज्यातील अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही
2. बारामती आणि राहुरी विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस
3. एलपीजी सिलिंडरची नोंदणी करण्यासाठी नागरिकांनी डिजिटल माध्यमांचा वापर करावा-केंद्र सरकारचं आवाहन
4. महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या अध्यक्षपदी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची बिनविरोध निवड आणि
5. सांगलीत आंतर विद्यापीठ नौकानयन स्पर्धेला उत्साहात सुरुवात; देशभरातील 685 खेळाडूंचा सहभाग

**नुकसान भरपाई मुख्यमंत्री-नाशिक**

राज्यात गेल्या आठवड्यात अनेक भागात अवकाळी पाऊस आणि गारपीटीमुळे पीकांचं नुकसान झालं आहे. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नियमानुसार शासनाकडून आवश्यक ती भरपाई देण्यात येईल अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ते काल नाशिकमध्ये अखिल भारतीय संत संमेलनाच्या कार्य समितीच्या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलत होते. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडलं जाणार नाही असं सांगून फडणवीस म्हणाले......

**शेतकऱ्यांना आम्ही मदत देणार आहोत महाराष्ट्रामध्ये आपण जर बघितलं असेल तर कुठेही अवकाळी पाऊस झाला गारपीट झाली किंवा अशा पद्धतीची कुठलीही नैसर्गिक आपत्ती आली तात्काळ आपण पंचनामे करतो आणि पंचनामे करून मदत करतो याही सगळ्या शेतकऱ्यांना जी काही आवश्यक मदत आहे ती केली जाईल.**

**केंद्रीय कृषीमंत्री**

दरम्यान, केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी अनेक राज्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टी आणि गारपिटीची स्वतःहून दखल घेतली असून कृषी मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांना पिकांच्या नुकसानीचा आढावा घेण्याचे निर्देश दिले आहेत. संबंधित राज्यांच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून माहिती संकलित करण्याच्या सूचनाही कृषी मंत्र्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

**भोंदूबाबा खरात**

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात यानं केलेल्या महिलांच्या लैंगिक छळवणूकीसह अन्य प्रकरणांची गतिमान चौकशी सुरू आहे. विशेष चौकशी पथकाकडं यासंदर्भात अनेक प्रकारची माहिती मिळाली असून त्या आधारे बनावट खात्यांद्वारे झालेल्या उलाढालीची सक्त वसुली संचनालनलयाच्यावतीनं तपासणी करण्यात येईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. खरात प्रकरणाचे सीडीआर हे तपास यंत्रणांच्या ऐवजी राजकीय व्यक्तींकडं कसे पोहोचले याबाबतची चौकशीही करण्यात येईल असं मुख्यमंत्री म्हणाले. याप्रकरणात कोणी राजकारण करू नये असा मुख्यमंत्र्यांनी पुनरुच्चार केला.

**रायगड**

दरम्यान रायगड जिल्ह्यात खालापूर इथं एका भोंदूबाबाला काल पोलिसांनी अटक केली आहे. एका विवाहित महिलेनं केलेल्या तक्रारीनंतर ही कारवाई करण्यात आली. अब्दुल रसिद उर्फ बाबा जान असं या भोंदूबाबाचं नाव आहे.

**कुंभमेळा-मुख्यमंत्री-नाशिक**

आगामी कुंभमेळ्यामुळे संताच्या विचारांनी धर्मातील प्रदुषण दूर होईल तसंच महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयकामुळं समाजातल्या गैरप्रकारांना आळा बसेल असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलं. ते काल नाशिकमध्ये अखिल भारतीय संत समिती आणि राष्ट्रीय कार्य समितीच्या दोन दिवसीय बैठकीच्या समारोप सत्रात बोलत होते. त्र्यंबकेश्वरमध्ये होणाऱ्या आगामी कुंभमेळ्यासाठी 35 हजार

कोटी रुपयांची विविध विकासकामं करण्यात येत आहेत. यामध्ये गोदावरी नदीच्या शुध्दीकरणाबरोबरच त्र्यंबकेश्वर इथं गोदावरीचा प्रवाह बारमाही व्हावा यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. कुशावर्तासाठी जलशुद्धीकरण प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. याशिवाय नाशिकमध्ये साधूग्रामसाठी कायमस्वरूपी जमीन अधिग्रहणाचा निर्णय घेण्यात आला आहे, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**उपमुख्यमंत्री**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी काल बारामती तालुक्यातल्या विविध गावांत जाऊन अवकाळी पावसानं झालेल्या पीक नुकसानीची पाहणी केली. तसंच शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांनी त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत केली जाईल, असं सांगत सरकार बळीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभं आहे असंही उपमुख्यमंत्री पवार यावेळी म्हणाल्या.

**गिरीष महाजन-पाहणी-नाशिक**

राज्याचे आपत्ती व्यवस्थापन आणि जलसंपदा मंत्री गिरीष महाजन यांनीही काल नाशिक जिल्ह्यात सिन्नर तालुक्यातल्या बाधित भागांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी महाजन यांनी प्रशासनाला तात्काळ पंचनामे करून नुकसानीचा सविस्तर अहवाल शासनाकडे सादर करण्याचे निर्देश दिले.

**पोट निवडणूक-सोलापूर**

बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि माजी आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानं या दोन्ही जागा रिक्त झाल्या आहेत. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आज उमेदवारी अर्ज भरणार आहेत. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आदरांजली म्हणून ही निवडणूक बिनविरोध करावी असं आवाहन महायुतीकडून करण्यात आलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं या निवडणुकीत उमेदवार उभा न करण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेसनं मात्र आपला उमेदवार रिंगणात उतरवण्याची भूमिका घेतली असल्याचं वृत्त आहे. ही निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी आमची इच्छा आहे, असं राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी म्हटलं आहे. महायुतीतील शिवसेना आणि भाजपाच्या नेत्यांनी याला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि काँग्रेस पक्षानंही सामंजस्याची भूमिका घ्यावी, अशी विनंती तटकरे यांनी केली आहे.

**अहिल्यानगर-पोटनिवडणुक**

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी आता पर्यंत चार उमेदवारांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. भारतीय जनता पार्टीनं शिवाजी कर्डिले यांचे चिरंजीव अक्षय कर्डिले यांना अधिकृत उमेदवारी जाहीर केली आहे. त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीतर्फे अद्याप कोणत्याही उमेदवाराची घोषणा झाली नाही. या दोन्ही जागांच्या पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्जाची छाननी उद्या म्हणजे सात एप्रिलला होणार आहे. नऊ एप्रिल पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत. 23 एप्रिलला मतदान आणि चार मे रोजी मतमोजणी होणार आहे.

**इंधन पुरवठा**

देशभरात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू असल्याचं केंद्र सरकारनं म्हटलं आहे. एलपीजी सिलिंडरची नोंदणी करण्यासाठी नागरिकांनी डिजिटल माध्यमांचा वापर करावा, वितरकांकडे जाऊन अनावश्यक गर्दी करू नये; असा सल्ला सरकारनं दिला आहे. एलपीजी वितरणाच्या बाबतीत होणारे अनुचित प्रकार टाळण्यासाठी; डिलिव्हरी ऑथेंटिकेशन कोड-आधारित एलपीजी वितरण आता 90 टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आलं आहे. तसंच 5 किलोचे छोटे एफटीएल सिलिंडर; ओळखीच्या किंवा पत्त्याच्या कोणत्याही वैध पुराव्याशिवाय एलपीजी वितरकांकडे उपलब्ध होतील, अशी माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने दिली आहे.

**खो-खो**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या अध्यक्षपदी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची काल बिनविरोध निवड झाली. बालेवाडी इथल्या शिवछत्रपती क्रीडा संकुलात झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत अध्यक्षपदासाठी निवडणूक अपेक्षित होती. मात्र, अध्यक्षपदासाठी एकच अर्ज आल्यानं निवडणूक बिनविरोध झाली. खो-खो संघटनेत अनेक वर्षांनी हा सन्मान एका महिलेला मिळाला आहे.

**नौकानयन-सांगली**

क्रीडाक्षेत्र हा करिअरचा सक्षम पर्याय म्हणून सामोर येत असून राज्य शासनाच्या सकारात्मक आणि कृतिशील धोरणामुळं राज्यातील क्रीडापटूंना स्थैर्य आणि सन्मान प्राप्त होत आहे असं मत राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री आणि सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केलं. सांगलीत आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग आणि कयाकिंग या नौकानयन स्पर्धांचं उद्घाटन करताना ते काल बोलत होते. भारतीय विद्यापीठे महासंघ आणि शिवाजी विद्यापीठ यांनी संयुक्तपणे याचं आयोजन केलं आहे. या नौकानयन स्पर्धेत देशभरातील 40 विद्यापीठांमधून 685 पुरुष आणि महिला खेळाडू सहभागी झाले आहेत.

**गडचिरोली**

राज्यात काही ठिकाणी कालही अवकाळी पावसानं हजेरी लावली. गडचिरोली जिल्ह्यात कुरखेडा तालुक्यातील रामगड इथं अंगावर वीज कोसळल्यानं एका युवकाचा मृत्यू झाला.

**हवामान**

विदर्भात गेल्या 24 तासात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. येत्या दोन दिवसात मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.
# नमस्कार.